## Module 1

**योग्य तो पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

**आवड ( आकर्षण)**

१. ........... म्हणजे व्यक्ती-व्यक्तींमधील आकर्षण होय.

(अ) आंतरव्यक्तिक आकर्षण (क) लैंगिक आकर्षण (ब) स्त्री-पुरुष नातेसंबंध (ड) बाह्य आकर्षण

२. आंतरव्यक्तिक आकर्षण ही अत्यंत मूलभूत........... प्रक्रिया आहे.

(अ) सामाजिक (ब) मानसिक (क) भावनिक (ड) व्यक्तिगत

३. यांच्या मते, सहवास प्रेरणा ही सहजप्रवृत्ती आहे.

(अ) मॅक्डुगल (ब) एरिकसन (क) किंबॉल यंग (ड) चार्लस् कुली

४. उत्क्रांतिवादानुसार............ प्रेरणा ही आदिम काळापासून आढळते.

(अ) सहवास (च) प्रशंसा (क) मान्यता (ड) अनुकरण

५. सहवास प्रेरणेच्या बाबतीत यांनी सखोल अभ्यास केला आहे.

(अ) गॅस्टर (ब) मॅकडुगल (क) लेअर्स (ड) एरिक्सन

६.......म्हणजे आंतरव्यक्तिक आकर्षणाचा आधार होय.

(अ) भाव-भावना (ब) इच्छा-आकांक्षा (क) प्रेरणा (ड) अध्ययन

७. भाव-भावना आणि आकर्षण यामध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण ........दिसून येतो.

(अ) संबंध (ब) संघर्ष (क) वेगळेपणा (ड) विरोध

८. दोन व्यक्तींमध्ये सकारात्मक भावनिक संबंध असतील तर त्यांच्यात परस्परांविषयी ........ असते.

(अ) आकर्षण (आवड) (ब) अनाकर्षण (क) संघर्ष (ड) सहकार्य

९. भाव-भावना आणि आकर्षण यांच्यातील संबंधाचा आपल्या वर्तनावर व जीवनावर प्रभाव दिसून येतो.

(अ) सामाजिक (ब) राजकीय (क) आर्थिक (ड) खाजगी)

१०. पुन्हा पुन्हा किंवा वारंवार दिसण्यामुळे आकर्षण निर्माण होते.

(अ) धनात्मक (ब) नकारात्मक (क) उपयोजनात्मक (ड) प्रासंगिक

११. ........... ही आकर्षणाची गुरुकिल्ली आहे.

अ) जवळीकता (ब) सारखेपणा (क) भिन्नता (ड) विरोधाभास

१२. झँजोन्क यांच्या संशोधनाला काही वेळा ........ परिणाम असे म्हटले जाते.

(अ) वारंवार दिसण्याचा (ब) वारंवार पाहण्याचा (क) वारंवार अवलोकनाचा (ड) वारंवार ऐकण्याचा

१३. तुलना सिद्धांत यांनी मांडला.

(अ) फोस्टिंजर (ब) बॅरन (क) न्यूकोंब (ड) फ्रॉईड

१४. इतरांशी परिणामकारकपणे आंतरक्रिया करण्यासाठी लोकांना मदत करणाऱ्या एकत्रित अभिक्षमता म्हणजे...... होय.

(अ) सामाजिक कौशल्ये (क) व्यक्तिगत कौशल्ये(ब) शारीरिक कौशल्ये (ड) यांत्रिक कौशल्ये

१५. व्यक्तिमत्त्व गुणविषयीचा पंचघटक सिद्धांत यांनी मांडला आहे.

(अ) गोल्डबर्ग (ब) कॅरेल (क) ऑलपोर्ट (ड) फ्रॉईड

१६. .......... यांनी वारंवारितादर्शक परिणाम स्पष्ट केला.

(अ) झॅझोंक (ब) न्यूकॉम्ब (क) मोर्फ (ड) सेबर्ट

१७.वाढत्या संपर्कातून ..........वाढते.

(अ) ओळख(ब) बुद्धिमत्ता(क) आकर्षण(ड) वजन

१८. विरुद्ध आकर्षणाला........... आकर्षण ही संज्ञा आहे.

(अ) समान (क) पूरक (ब) बरोबरीची (ड) जास्त

१९........... यांनी सारखेपणा सिद्धान्त कल्पना मांडली.

(अ) फ्रान्सिस गाल्टन (ब) झॅझोंक (ड) न्यूकॉम्ब (क) फेस्टिंगर

२०.............. यांनी सामाजिक तुलना सिद्धान्त मांडला.

(अ) सेबर्ट (ब) फेस्टिंगर(क) गाल्टन (ड) झॅझोंक

२१. सकारात्मक आणि नकारात्मक भावना या....... . आहेत.

(अ) संकीर्ण(ब) समान(क) आनुवांशिक (ड) तटस्थ

२२. आकर्षणामध्ये........ हा महत्त्वाचा घटक आहे.

(अ) देहबोली(ब) जवळीकता(क) वातावरण(ड) अनुवंश

२३.जे सुंदर आहे ते चांगले आहे हा परिणाम.......... आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अभ्यास केला.

(अ) सेबर्टन (ब) न्यूकॉम्ब(क) लेमे (ड) मोर्फ

२४. ........... व्यक्तीचा स्व-आदर उच्च आणि बिनबुडाचा असतो.

(अ) आत्मरत(ब) अंतर्मुख (क) बहिर्मुख (ड)सद्सद्विवेकी

# Module 2

## सामाजिक प्रभाव

१.बदल घडवणे म्हणजे दुसऱ्याचे मन वळवणे होय.

(अ) अभिवृत्ती (ब) अभिरुची (क) मानदंड (ड) दर्जा

२. व्यक्तीची इच्छा असो वा नसो दिलेल्या आदेशाप्रमाणे कृती करावी लागते त्याला........... म्हणतात.

(अ) आज्ञाधारकता (ब) अनुपालन (क) अभिवृत्ती (ड) मानदंड

३. आज्ञाधारकतेचे एकूण......... प्रकार पडतात.

(अ)२ (ब) ४ (क)६ (ड)३

४........म्हणजे विशिष्ट समूह आणि समाजमान्य वर्तनाप्रमाणे वागण्याचा दबाव होय.

(अ) अनुसारिता (ब) अनुपालन (क) अनुकरण (ड) मानदंड

5. ...........म्हणजे इतरांना विशिष्ट प्रकारे वर्तन करण्यास भाग पाडणे होय.

(अ) अनुपालन (ब) आकर्षण (क) परस्परपूरकता (ड) भूमिका

६. सामाजिक प्रभावाला खाजगीमध्ये स्वीकृती कशी दिली जाते यावर १९३७ मध्ये .........यांनी संशोधन केले.

(अ) शेरीफ (ब) झिंबार्डो(क) निमोन्सी (ड) किंग्ज

७. सामाजिक दबावावर सुरुवातीला १९५० मध्ये......... यांनी प्रयोग केले.

(अ) ॲश (ब) हॅटफिल्ड (क) रॅपसन (ड) वॉलस्टर

८. औपचारिक व अनौपचारिक मानदंडाशिवाय आणखी.......... प्रकार मानदंडाचे पडतात.

(अ)३ (ब) २ (क) ४ (ड)५

९. ............... म्हणजे विशिष्ट परिस्थितीत व्यक्तीने कसे वागावे, कसे वागू नये याबद्दल असलेले नियम होत.

(अ) मानदंड (ब) दर्जा (क) भूमिका (ड) स्थान

१०. म्हणजे नियमांशी सुसंगत असे वर्तन होय.

(अ) अनुसारिता (ब) अ अनुसारिता(क) अनुपालन (ड) अनुबंध

११. सामाजिक ............. याचा वर्तनावर परिणाम होतो.

(अ) मापदंड(ब) दंड(क) दंडका (ड) दहशती

१२. सामाजिक प्रभावाविषयी..... विशेष संशोधन केले.

(अ) सोलोमन अँश (ब) शेरीफ (क) गॅलिन्स्की (ड) मॅगी

## Module 3

# समाजाभिमुख वर्तन

१. तदनुभूतीच्या अनुषंगाने इतरांना मदत केल्यामुळे आपणास...... मिळते.

(अ) समाधान (ब) स्वार्थभाव (क) काहीच वाटत नाही(ड) उगीच मदत केली

२. विविध संशोधनांच्या साहाय्याने तदनुभूतीमध्ये महत्त्वाचे ....... घटक सापडतात.

(अ) ३ (ब) ४ (क) ५ (ड) २

३. तदनुभूतीतील बोधात्मक घटकालाच तदनुभूती.......घटक असे संबोधतात.

(अ) अचूकता (ब) परहित (क) स्वार्थ (ड) नकार

४. स्वमग्नता या मानसिक विकृतीमध्ये सामाजिक....... ची कमतरता असते.

(अ) संप्रेषण (ब) सहकार्य (क) सहभाग (ड) अनुभव

५. समाजाभिमुख वर्तनातील बघ्यांची भूमिका किंवा बघ्यांचा परिणाम या संदर्भात........ या सामाजिक मानसशास्त्रज्ञांनी महत्त्वपूर्ण संशोधन केले आहे.

(अ) डाली व लाटाने (ब) ब्रायन व टेस्ट (क) ग्रुडर व रोमर (ड) क्रिचलो व लिऊ

६. तातडीच्या प्रसंगी समाजाभिमुख वर्तन घडेल की नाही किंवा मदत केली जाईल की नाही हे ठरविणाऱ्या ..... मुख्य पायऱ्या डालीं व लाटाने यांनी स्पष्ट केल्या आहेत.

(अ) ३ (ब) ४ (क) ५ (ड) ६

७. ज्या व्यक्ती रूप-सौंदयनि आकर्षक आहेत अशा व्यक्तींना अनाकर्षक व कुरूप व्यक्तींपेक्षा ........... मदत केली जाते.

(अ) जास्त (ब) कमी (क) अजिबात नाही (ड) कधी-कधी

८. समाजाभिमुख वर्तन करणाऱ्या ........ व्यक्तींच्या अनुभवामुळे किंवा प्रत्यक्ष उदाहरणांमुळे समाजाभिमुख वर्तन वाढीस लागते.

(अ) आदर्श (ब) समाजविरोधी (क) अल्पसंख्य (ड) राजकीय

९. सामाजिक-आर्थिक दर्जा आणि समाजाभिमुख वर्तन यामध्ये .............संबंध दिसून येतो.

(अ) नकारार्थी (ब) होकारार्थी (क) परस्परविरोधी (ड) एकमार्गी

१०.व्यक्तींमध्ये इतरांना मदत करण्याची प्रवृत्ती कमी दिसून येते.

(अ) समाज बहिष्कृत (ब) समाजप्रिय (क) समाजशील (ड) अपसामान्य

११. माणूस हा........ प्राणी आहे.

(अ) हिंस (ब) बुद्धिमान (क) समाजप्रिय (ड) एकलकोंडा

१२.......... च्या मते, मानवाच्या इच्छा-आकांक्षा त्याच्या आंतरिक व बाह्य घटकांवर अवलंबून असतात.

(अ) फ्रॉईड (ब) स्टॅन्ले (क) फोर्गस (ड) इगली

१३............या संशोधकाला आनंदी, समाधानी व्यक्तींनी इतरांना मदत केल्याचे आढळते.

(अ) वॅटसन (ब) स्टॅन्ले (क) विल्सन (ड) आयसेन

१४. ............ यांच्या मते, पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया तत्परतेने मदतीसाठी पुढे धावतात.

(अ) फ्रॉईड (ब) ॲडलर (क) इगली (ड) विल्सन

१५. लोकसहभागातून........ ही संकल्पना मूळ धरू लागली आहे.

अ)स्व- कल्याण (ब) राष्ट्रकल्याण (क) लोककल्याण (ड) आंतरक्रिया

१६.इतरांना मदत करण्याची वृत्ती म्हणजे .......वर्तन होय.

(अ) समाजाभिमुख (ब) मानवाभिमुख (क) वर्तनाभिमुख (ड) यांपैकी नाही.

१७. ..............इतरांना मदत करणे चांगले वाटते.

(अ) तद्अनुभूतीमुळे (ब) संघर्षामुळे (क) आनंदामुळे (ड) दु:खामुळे

१८. तद्अनुभूती.......... घटकांनी मिळून बनलेली असते

(अ) तीन (ब) दोन (क) चार (ड) पाच

१९.तद्अनुभूतीचे प्रशिक्षण दिले तर........ प्रतिबिंब क्षेत्रावर परिणाम होऊन ती क्षमता वाढते.

अ) मज्जापेशी (ब) अग्रखंड (क) पार्श्वखंड (ड) मध्य खंड

२०. सामाजिक वर्ग ज्यांच्याकडे कमी आहे ते ....... देतात

(अ) जास्त(ब) आनंद (क) दुःख (ड) कमी

२१. आपण वेळेचे मूल्य पैशात मोजल्याने समाजाभिमुख वर्तन.... होते

(अ) कमी (ब) जास्त (क) साधारण(ड) यांपैकी नाही.

२२) ............निधी समाजशील वर्तनाचा नवा प्रकार आहे.

(अ) जनहित/जनसहयोग (ब) कल्याण (क) सार्वजनिक (ड) यांपैकी नाही.